# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 16.11.2025** **वार- रविवार**

---

**पदवीधर मतदार यादी**

पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्याकरता 3 डिसेंबर तर अंतिम मतदार याद्या तयार करण्याकरता येत्या 12 जानेवारी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी आज ही माहिती दिली. सुधारित कार्यक्रमानुसार प्रारुप मतदार याद्यांवर 3 ते 18 डिसेंबर या कालावधीत दावे आणि हरकती नोंदवता येतील. त्यानंतर 12 जानेवारी रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

**आहार महोत्सव**

राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेनं आठव्या निसर्गोपचार दिनानिमित्त आजपासून तीन दिवसांच्या नैसर्गिक आहार महोत्सवाचं आयोजन केलं आहे. येवलेवाडी इथल्या निसर्ग ग्राम परिसरात आयोजित या महोत्सवात विविध वैज्ञानिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रम होतील असं प्रभारी संचालक अमरेंद्र सिंह यांनी म्हटलं आहे. या नैसर्गिक आहार महोत्सवाचा समारोप येत्या मंगळवारी होणार आहे. समारोप सोहळ्याला राज्यपाल आचार्य देवव्रत आणि केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**एसटी**

राज्यातल्या शाळा आणि महाविद्यालयांना शैक्षणिक सहलीसाठी एसटीच्या नवीन बस उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. शिक्षण संस्था आणि विद्यार्थ्यांना स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाचा आनंद घेता यावा हा यामागचा उद्देश असल्याचं त्यांनी सांगितलं.

**रेल्वेमोहीम**

पुणे रेल्वे विभागाने अनधिकृत आणि विनातिकिट प्रवास करणाऱ्यांविरुद्ध मोठी मोहीम सुरु केली आहे. गेल्या सात महिन्यांत केलेल्या कारवाईत 23 लाख 76 हजार प्रवाशांना विनातिकिट किंवा अवैध तिकिटासह प्रवास करताना पकडलं आहे.

**आरोग्य स्वराज्य**

रुग्णाला त्याच्या परिसरात निःशुल्क किंवा परवडणाऱ्या दरांत आरोग्य सेवा मिळायला हवी असं मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते आज पुण्यात बोलत होते. डॉक्टर बंग यांनी लिहिलेल्या या पुस्तकाचं प्रकाशन ज्येष्ठ लेखक दिलीप माजगावकर, करुणा गोखले, साक्षी भोसले, कल्याणी मांडके, रसिका राठीवडेकर यांच्या हस्ते झालं.

**प्रकाशन**

देश आणि समाजसेवेसाठी जाती-धर्म, प्रांत, भाषा यापलीकडे जाऊन कार्य करायला हवं असं प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे माजी सचिव आणि माय होम इंडियाचे संस्थापक सुनील देवधर यांनी केलं. अमितकुमार बॅनर्जी यांच्या जीवन कार्यावर आधारित 'संघर्षगाथा माझ्या आयुष्याची' या आत्मकथनपर पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते पुण्यात बोलत होते.

ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत आणि संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे, डॉ. अनिल गुंजाळ, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. संपर्क संस्थेच्या बालग्राम या उपक्रमाचे संस्थापक अमितकुमार बॅनर्जी यांच्या रुपाने महाराष्ट्रातील असंख्य अनाथ मुलांना ममता मिळाली आहे. प्रत्येक व्यक्तीला समाजाकडून खूप गोष्टी आयुष्यभर मिळत असतात, सेवाभावातून आपण प्रत्येकाने त्याची परतफेड करायला हवी, असं सुनील देवधर म्हणाले.

**विश्वबंधुता**

विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समिती, काषाय प्रकाशन आणि बंधुता प्रकाशन या संस्थांनी संविधान दिनानिमित्त 'आम्ही सावित्रीच्या मायलेकी' या महाकाव्य संमेलनाचं आयोजन केलं आहे. येत्या 25 नोव्हेंबर रोजी पुण्यात हे संमेलन होणार असल्याची माहिती विश्वबंधुता साहित्य परिषदेचे सरचिटणीस प्रा. शंकर आथरे यांनी नुकतीच पत्रकार परिषदेत दिली. यंदाचा 'क्रांतीसूर्य सावित्रीज्योति पुरस्कार' बंधुता चळवळीत गेल्या 51 वर्षांपासून योगदान देणाऱ्या मंदाकिनी आणि बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांना जाहीर करण्यात आला आहे.

**Pmc**

पुणे महापालिकेने कर थकवणाऱ्या नागरिकांसाठी 15 नोव्हेंबरपासून अभय योजना सुरू केली आहे; या निर्णयाच्या निषेधार्थ माजी विरोधी पक्षनेते उज्ज्वल केसकर यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना पत्र पाठवलं आहे. वेळेवर कर भरणाऱ्या प्रामाणिक करदात्यांना केवळ दोन टक्केच लाभ मिळतो, हे अन्यायकारक असून त्यांना किमान 25 टक्के सवलत देण्यात यावी, अशी  मागणी उज्वल केसकर यांनी केली  आहे.

**बाजारसमिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून सुमारे 90 ट्रक  फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्याने भेंडी, वांगी, काकडी, टोमॅटो, घेवडा, शेवगा, दोडका, कारली , दुधी भोपळा महागले आहेत. पालेभाज्यांची तेजी या आठवड्यातही टिकून आहे. थंडी सुरू झाल्याने फळ बाजारात बोरांचा हंगाम सुरू झाला आहे. मागणी वाढल्याने बोरं तसंच डाळिंब आणि पेरू महागले आहेत. लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने फुल बाजारात पारंपरिक फुलांप्रमाणेच शोभिवंत फुलांचे भावही वधारले आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात थंडीचा कडाका वाढला असून आज किमान तापमान 10 पूर्णांक 6 दशांश अंश तर कमाल तापमान 29 तर सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**